# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**Tel :** (0253) 2539198/268,6659198/6659268 **Fax :** (0253) 2539200,6659200
**Website :** www.muhs.ac.in, **E-mail :** academic2@muhs.ac.in

**डॉ.कालिदास द. चव्हाण**
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
**कुलसचिव**

**Dr.Kalidas D. Chavan**
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
**Registrar**


जा.क्र. मआविवि/९६०/२०२०

दि.०९/०४/२०२०

*तात्काळ/कालमर्यादीत*

*परिपत्रक २०२०*

विषय :- **iGOT ( Integrated Govt. Online Traning) courses on DIKSHA platform on COVID-19 Pandemic** नुसार आपत्कालीक परिस्थितीमध्ये कोविड-१९ या आजाराविरुध्द रुग्णास आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक/ शिक्षक/ डॉक्टर/पॅरामेडीकल कर्मचारी/अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थी यांना प्रशिक्षण देणेबाबत...

संदर्भ :- शासन परीपत्रक क्रं. एमईडी-१०२०/प्र.क्र.८३/२०/शिक्षण-२ दि. ०८/०४/२०२०

मला प्राप्त आदेशान्वये व उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, केंद्र शासन व आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारे कोविड-१९ या आजाराचा प्रार्दुभाव रोखण्याच्या अनुषंगाने www.mohfw.gov.in या वेबसाईटवर "Updated List of Training Resources for COVID-19 Management" या मथळयाखाली Capacity Building for Health Care Professional या संदर्भात माहीती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच, केंद्र शासनाच्या **Ministry of Personal, Public Grievance & Pensions** अंतर्गत **Department of Personnel & Training** यांच्या पत्रानुसार **iGOT (Integrated Govt. Online Traning) courses on DIKSHA platform on COVID-19** समाजातील विविध वर्गासाठी प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम **https://igot.gov.in** या लिंकवर उपलब्ध आहे. त्या अनुषंगाने शासनाने प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी संख्येचा साप्ताहीक अहवाल दर शुक्रवारी विद्यापीठाने शासनास सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. (सोबत शासनाचे परीपत्रक जोडले आहे)

तरी विद्यापीठाशी संलग्न विविध आरोग्य विज्ञान विषयक अभ्यासक्रमाच्या संस्थामार्फत सर्व घटकांना कोविड-१९ या साथ रोगाबाबत आवश्यक प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. त्यामुळे अत्यावश्यक आपत्कालीन परिस्थितीत सहाय्यकारी किंवा मुख्य सेवा देण्यासाठी प्रशिक्षित डॉक्टर, परिचर्या व इतर परावैद्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध होऊ शकेल.

याद्वारे सर्व संलग्नीत महविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांना कळविण्यात येते कि, त्यांनी त्यांच्या अधिनस्त प्राध्यापक/शिक्षक/डॉक्टर/पॅरामेडीकल कर्मचारी/अधिकारी/कर्मचारी व विद्यार्थी यांच्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने महाविद्यालयस्तरावर यथोचीत कार्यवाही तत्काळ सुरु करावी व प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीच्या संख्येबाबतचा संवर्गनिहाय अहवाल (सहपत्र "अ" प्रमाणे) डॉ. प्रदीप आवळे यांना met@muhs.ac.in या ईमेल आयडीवर दर शुक्रवारी सकाळी ११.०० वाजेपर्यंत न चुकता पाठविण्यात यावा. राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) विद्यार्थ्यांबाबत स्वतंत्र अहवाल सादर करयात यावा. जेणेकरुन विद्यापीठास सदर माहीती शासनास वेळेत सादर करता येईल.

KALIDAS DATTATRAYA CHAVAN

Digitally signed by KALIDAS DATTATRAYA CHAVAN
Date: 2020.04.09 17:42:16 +05'30'

कुलसचिव

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य,

मआविवि संलग्नित सर्व महाविद्यालये व रुग्णालये,